Pravarsen Shikshan Sanstha, Nagpur

# Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce, Pauni Dist- Bhandara

## Workshop on Personality Development

Date :- 17 to 22 May 2021 Time:- 12.00pm to 1.00pm

### Schedule of the Workshop

| | |
|---|---|
| Date 17.05.2021 | **Topic** :- Role of Language and Literature in Personality development<br>**Resource Person** :- Dr. Kamlakar Payas , Assist. Prof.(Marathi) Taxshila Mahavidyalya Amravati |
| Date.18.05.2021 | **Topic** :- Stress Management after infection from Covid-19<br>**Resource Person** :- Mr.Amrutsiddhi, Dhammachari TBM Nagpur |
| Date 19.05.2021 | **Topic** :- Entrepreneurship and skill require for successful Business Management<br>**Resource Person** :- Dr. Narendra S. Bagade, Associate Professor and Vice Principal, Head of the department Commerce & Management PWS College Nagpur |
| Date 20.05.2021 | **Topic :** Psychological impact on students about examination during Covid-19<br>**Resource Person** :-Dr. Alka Sanjay Kolhe, CHB(Contributory Lecturer ) & Counsellor, Psychologist Nagpur |
| Date 21.05.2021 | **Topic** :- Development of E- content<br>**Resource Person** :-Mr. Devanand Gharat, Subject Coordinator IT Section DIET Bhandara |
| Date 22.05.2021 | **Topic** :-Education during Covid-19<br>**Resource Person** :- Miss. Mangala Ganvir, Techno Teacher State Rewarded Teacher , Educationalist Bhandara |

**Organised by**

Mr. Nandkishor P. Sinagde
Vice Principal

Mr. Sanjay M. Nandagawali
Officiating Principal & IQAC Coordinator

Scanned by CamScanner

प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचालित

डॉ.एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, पवनी जि. भंडारा

ऑनलाईन व्यक्तीमत्व विकास मार्गदर्शन कार्यशाळा

दिनांक :— १७ मे २०२१ ते २२ मे २०२१

वेळ दु. १२.०० ते दु. १:०० वाजता

## कार्यक्रमाची रूपरेषा

### उद्घाटन समारंभ

दिनांक :— १७ मे २०२१

वेळ :— दु. १२.०० वाजता

| | |
|---|---|
| कार्यक्रमाचे अध्यक्ष | :— मान. डॉ. दीपा मिलिंद बलखंडे<br>अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर |
| उद्घाटक | :— मान. श्री. मिलिंद लक्ष्मीकांत बलखंडे<br>सचिव, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर |
| प्रास्ताविक | :— प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य |
| आभार | :— प्रा. नंदकिशोर सिंगाडे, उपप्राचार्य |
| संचालन | :— प्रा. विलास मेश्राम |

### समारोपीय कार्यक्रम

दिनांक :— २२ मे २०२१

वेळ:— दु. १:०० ते दु. १:३० वाजता

| | |
|---|---|
| कार्यक्रमाचे अध्यक्ष | :— मान. डॉ. दीपा मिलिंद बलखंडे<br>अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर |
| प्रमुख उपस्थिती | :— मान. श्री. मिलिंद लक्ष्मीकांत बलखंडे<br>सचिव, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर |
| प्रमुख उपस्थिती | :— प्रा. संजय नंदागवळी<br>कार्यकारी प्राचार्य तथा IQAC समन्वयक |

टिप— १) उपरोक्त कार्यक्रम ऑनलाईन Google meet या आभासी (Virtual) मंचावर घेण्यात येईल.

२) कार्यक्रमाच्या नियोजित वेळेच्या १५ मिनिटे आधी लॉग—इन करावे.

Link :- https://meet.google.com/oeg-uiie-mer

वरील लिंक ला क्लिक करून विद्यार्थ्यांनी जाईन व्हावे

आयोजक

प्राचार्य

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड

कॉमर्स, पवनी जि. भंडारा

Scanned by CamScanner

Pravarsen Shikshan Santha Nagpur's
Dr.L.D. Balkhande College of Arts & Commerce
( Old Name: P.S.S. College) Pauni-441910,Dist- Bhandara
NAAC Accrediation ' C ' Grade
E-mail ID :- pss_pauni@rediffmail.com/drldbalkhandecoaac@gmail.com Phone 07185-255490
Website:- http://www.balkhandecollege.com

•President• Dr. Deepa M. Balkhande
•Secretary• Mr. Milind L. Balkhande
•Officiating Principal• Mr. Sanjay M. Nandagawali

Ref. No:- 3351 |2021 Date :- 24-05-2021

## अहवाल

## डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, पवनी येथे सहा दिवसीय ऑनलाईन व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, पवनी येथे दि. १७/०५/२०२१ ते २२/०५/२०२१ सहा दिवसीय ऑनलाईन व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या ऑनलाईन व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्घाटनिय अध्यक्ष, मा. डॉ. दीपा बलखंडे, अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर, उद्घाटक मा. मिलिंद बलखंडे सर, सचिव, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये मा. प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य, मा. प्रा. नंदकिशोर सिंगाडे, उपप्राचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

ऑनलाईन व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन कार्यशाळेचे अध्यक्ष, मा. डॉ. दीपा बलखंडे, अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर यांनी अध्यक्षिय मनोगतातून सांगितले की, व्यक्तिमत्व विकासामुळे मन नेहमीच आनंदी, उत्साही व सृजनशील राहते. त्यामुळे माणूस नेहमीच नवनवीन आव्हाणे स्विकारतो व तो ती आव्हाणे यशस्वी करतो. असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उद्घाटक मा. मिलिंद बलखंडे सर, सचिव, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर यांनी उद्घाटनीय मनोगतातून सांगितले की,व्यक्तीचे बाहयसौंदर्य म्हणजे व्यक्तिमत्व नव्हे. व्यक्तीने कर्तृत्वातून व्यक्तिमत्व घडविले पाहीजे बराक ओबामा, सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन हे व्यक्ती आज त्यांच्या व्यक्तिमत्वामुळेच जगात ओळखले जातात. व्यक्तिमत्व माणसाला विकसित करण्याचे प्रभावी शस्त्र आहे. असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक मनोगतातून व्यक्त करतांना मा. प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. स्पर्धेच्या युगात व्यक्तिमत्व विकासाला अनन्यसाधारण महत्व आहे. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याने व्यक्तिमत्व विकास साधावा असे मत व्यक्त केले. पहिल्या दिवसाचे प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. कमलाकर पायस, सहाय्यक प्राध्यापक, तक्षशिला महा. अमरावती यांनी 'व्यक्तिमत्व विकासात भाषा व साहित्य यांचे योगदान' या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, ग्रहणशिलता हा विकसित माणसाचा गुणधर्म आहे. साहित्याच्या माध्यमातून व्यक्तिमत्व घडत असते. माणसाची वाणी सम्यक असायला पाहिजे असे मत व्यक्त केले. दुस—या दिवसाचे प्रमुख मार्गदर्शन मा. अमृतसिध्दी, धम्मचारी, टि.वी.एम, नागपूर यांनी 'कोरोनाची लागण झाल्यानंतर तणाव मुक्ती व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, विद्यार्थ्यांना

Scanned by CamScanner

विकास साधायचा असेल तर त्यांनी विज्ञानवादी दृष्टीकोनाचा अवलंब करायला पाहिजे.तणावमुक्तीसाठी वाचनाचा छंद जोपासने महत्वाचे आहे. असे मत व्यक्त केले.

तिस–या दिवसाचे प्रमुख मार्गदर्शक मा. नरेंद्र बागडे, सहयोगी प्राध्यापक, उपप्राचार्य, मधुकरराव वासणिक, पीडब्लूएस महाविद्यालय, नागपूर यांनी 'उदयोजगता आणि कौशल्य व्यवसायात व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, आजचे युग वैयक्तिक पात्रतेचे आहे. तुमच्यात जर पात्रता असेल तर तुमचे जीवन रेखीव, मोलाचे बनते. असे मत व्यक्त केले. चवथ्या दिवसाचे प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. अल्का कोल्हे, सी.एच.बी सहाय्यक व्याख्याता व समुपदेशक, नागपूर यांनी 'कोवीड–१९ च्या दरम्यान परिक्षेसंदर्भात विद्यार्थ्यावर होणारा माणसिक परिणाम' यांनी या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, आज कोवीड–१९ मुळे व्यक्ती गोंधळलेला आहे. बौध्दीक दृष्टया आपण खालावत चाललो आहोत. माणसाच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तेव्हा विद्यार्थ्यानी सकारात्मक दृष्टीकोन बाळगावा असे मत व्यक्त केले.

पाचव्या दिवसाचे प्रमुख मार्गदर्शक मा. देवानंद घरत, आयटी एक्सपर्ट, डायट, भंडारा यांनी 'ई–सामग्री विकास, ई–तंत्रज्ञानाचा विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, कोविड–१९ मुळे सर्व क्षेत्रात आमुलाग्र बदल घडुन येत आहेत. पुस्तकी ज्ञानाच्या पलिकडे नवीन माहिती देणारी ही प्रणाली आहे. आपण युझर पेक्षा क्रियेटर बणने गरजेचे आहे. असे मत व्यक्त केले.

सहाव्या दिवसाचे प्रमुख मार्गदर्शक मा. मंगला गणविर, प्रथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिचाळ, पंचायत समिती पवनी यांनी 'कोवीड–१९ काळातील शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, ज्या विद्यार्थ्यांना परिस्थितीची जाणीव असते तेच विद्यार्थी नवनिर्मिती करू शकतात. आजच्या विद्यार्थ्याला परिस्थिती जाणीव नाही. तो अनुकरणीय आहे. कृषी क्षेत्राचा कणा म्हणजे महाविद्यालयातील ग्रामीण विद्यार्थी होय. विद्यार्थ्यांने सृजनशीलतेचा स्विकार करावा. असे मत व्यक्त केले.

समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा. डॉ. दीपा बलखंडे, अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर, प्रमुख अतिथी मा. मिलिंद बलखंडे सर, सचिव, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर प्रमुख उपस्थितीत मा. प्रा. संजय नंदागवळी, कार्यकारी प्राचार्य, मा. प्रा. नंदकिशोर सिंगाडे, उपप्राचार्य हे होते.


या सहा दिवसीय कार्यशाळेचे संचालन प्रा. विलास मेश्राम यांनी केले तर आभार प्रा. नंदकिशोर सिंगाडे, उपप्राचार्य यांनी मानले. या सहा दिवसीय कार्यशाळेला संपूर्ण प्राध्यापकवृंद व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया प्रमाणत ऑनलाईन उपस्थित होते.


Officiating Principal
Dr. L.D. Balkhande
College of Arts and Comm
Pauni. Dist. Bhandara

Scanned by CamScanner

Workshop on Personali Development Porgam

17 May To 22 May 2021





Scanned by CamScanner

Workshop on Personali Development Porgam

17 May To 22 May 2021







Scanned by CamScanner